# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**टिपण्णी :- विभागीय अधिकारी अधिकारी (पाम्स) विभाग** **क्र.** ५१ /१/२०११

विषय :- दिनांक ०९/१२/२०१० रोजी मा.मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे पार पडलेल्या बेठकीचे इतिवृत्त.

चंद्रपूर कृती आराखडा व अंमलबजावणीबाबत मा. मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली संबंधीत शासकीय विभागांची दिनांक ०९/१२/२०१० दुपारी ३.०० वाजता उद्यम सभागृह, उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे घेण्यात आलेल्या बैठकीचे प्रारुप इतिवृत्त सादर.

11/1/2011

क्षेत्रीय अधिकारी (पाम्स) :

मान्यतेसाठी

11/1/11

12/1/2011

CH/SEC(Env)

18/1

दि. १८/१/११

19/1

A.1. issue

20/1/11

**चंद्रपूर कृती आराखडा व अंमलबजावणीबाबत मा. मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली संबंधीत शासकीय विभागांची दिनांक ०९/१२/२०१० दुपारी ३.०० वाजता उद्यम सभागृह, उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे घेण्यात आलेल्या बैठकीची इतिवृत्त.**

# मसुदा

मा. मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९/१२/२०१० रोजी चंद्रपूर कृती आराखडा व अंमलबजावणीबाबत मा. मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली संबंधीत शासकीय विभागांची दिनांक ०९/१२/२०१० दुपारी ३.०० वाजता उद्यम सभागृह, उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये पर्यावरण विभागाच्या सचिव व संचालक, उद्योग उर्जा व कामगार विभागाचे सचिव , म.प्र.नि.मंडळाचे सदस्य सचिव व जिल्हाधिकारी, चंद्रपूर तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, म.औ.वि.महामंडळ, भारतीय खान ब्युरो, खनिकर्म संचालनालय व म.प्र.नि.मंडळाचे व पर्यावरण विभागाचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

सचिव (पर्यावरण) यांनी सर्व उपस्थितांना सदर बैठकीचे महत्व व उद्दीष्ट समजावून सांगितले. त्यानंतर म.प्र.नि. मंडळाचे सदस्य सचिव यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषणाच्या समस्या, केंद्र शासनाने चंद्रपूर जिल्ह्यातील काही भाग गंभीर प्रदूषित क्षेत्र म्हणून घोषित करणे, चंद्रपूर कृती आराखडा व विविध शासकीय विभागांनी संबंधित बाबीवर करावयाची अंमलबजावणीबाबत मा. अध्यक्ष तसेच उपस्थित असलेले विविध शासकीय विभागांचे सचिव व प्रतिनिधी यांना अवगत केले. सदर बैठकीमध्ये चंद्रपूर कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली व त्यानुसार सदर कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे ठरविण्यात आले.

१. <u>खनिज वाहतुक, ओव्हर लोड व वाहतुकीदरम्यान ताडपत्री न वापरल्यामुळे निर्माण झ ालेल्या हवा प्रदुषणाच्या समस्या.</u>

खनिज जसे मुख्य:त कोळसा वाहतुकीमुळे, ओव्हरलोडमुळे तसेच कोळसा वाहतुकीदरम्यान ताडपत्री न वापरल्यामुळे निर्माण होत असलेल्या प्रदूषणाच्या समस्येबाबत उप-प्रादेशिक अधिकारी, परिवहन विभाग यांनी वे ब्रीज ची तपासणी करावी. यासाठी परिवहन विभागास जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी पोलिस विभागामार्फत अतिरीक्त मनुष्यबळ वेळोवेळी दयावे. तसेच परिवहन विभागातर्फे शहरामध्ये नविन वे ब्रीज तयार करून त्या ठिकाणी सनियंत्रण करावे. याबाबत परिवहन विभागाने कृती आराखडा तीन महिन्यात सादर करावा.

२. <u>कृती आराखडा राबविण्यासाठी खनिज विकास निधीचा वापर करणे.</u>

कोळसा खाणीच्या परिसरातील गावांचा विकासासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी जसे रस्ते बांधणे, वृक्ष लागवड करणे इ. बाबीसाठी खनिज विकास निधीचा वापर करण्यात यावा व यासाठी वेकोलीने सुध्दा ५० टक्के अर्थसहाय्य करावे, असे ठरले. त्याचप्रमाणे सदर प्रस्ताव तयार करून मा.मंत्री महोदयांच्या मार्फतच संबंधित विभागास खनिज विकास निधीतुन अर्थसहाय्य मंजूर करणेसाठी पाठवावे, असे ठरले.

..२/-

११

३. **चंद्रपूर शहरातील कोल डेपो हटविणेबाबत.**

चंद्रपूर शहरामधील चंद्रपूर-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर असलेले कोल डेपोमध्ये कोळशाची हाताळणी होत असते, त्यामुळे कोळसा धुळीकणांचे उत्सर्जन होते. या कोल डेपोमध्ये हवा प्रदूषण नियंत्रणासाठी कोणतीही उपाययोजना केलेली नाही. तसेच याबाबत कोणत्याही विभागातर्फे संनियंत्रण करण्यात येत नाही. त्यामुळे या राष्ट्रीय महामार्गावरील कोल डेपो हटविण्यासाठी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी कार्यवाही करावी, असे ठरले. या राष्ट्रीय महामार्गावरील स्थित असलेले कोल डेपोची यादी म.प्र.नि.मंडळाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दयावी.

४. **चंद्रपूर शहरासाठी बायपास रोड बांधणे.**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी चंद्रपूर शहरासाठी बायपास रोड बांधण्याची असमर्थता दर्शविली. याबाबत त्यांनी वन जमिन व नदीचा भाग इ. बाबी बायपास रोड बांधण्यास अवरोध करतात असे सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींनी सध्या सुरू असलेले रोड बांधकामाचे प्रकल्प तसेच मंजुर झालेल्या प्रकल्पाबाबत माहिती दिली. त्याचप्रमाणे नविन प्रकल्पांना निधीअभावी मंजुरी मिळणार नाही, असेही सांगितले. सध्या सुरू असलेले व मंजुर झालेले रस्ते बांधणी प्रकल्प एक ते दीड वर्षाच्या कालावधीमध्ये पुर्ण करावेत अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

५. **नागरी घनकचरा व्यवस्थापन, मल प्रक्रिया व विल्हेवाट.**

चंद्रपूर शहरातील निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर मल प्रक्रिया केंद्र उभारलेले नाही. तसेच मल वाहून नेण्यासाठी वाहिनी सुध्दा टाकलेली नाही. त्याचप्रमाणे चंद्रपूर शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी सध्या अस्तित्वात असलेले घनकचरा व्यवस्थापन केंद्र कार्यरत नाही व त्याची क्षमता एकुण निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यापेक्षा कमी आहे. या विषयावर संबंधित विभागाने नगर परिषदेने लक्षकेंद्रित करून आवश्यक उपाययोजना करावी. मल प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी राष्ट्रीय नदी कृती आराखड्या अंतर्गत प्रकल्प किंमतीच्या ७० टक्के अर्थसहाय्य देण्यात येते. ही माहिती देण्यात आली.

६. **चंद्रपूर शहरामध्ये इंधन म्हणुन कोळसा वापरावर बंदी.**

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी असल्यामुळे कोळशाचा इंधन म्हणुन घरगुती वापर करण्यात येतो. यामुळे सुध्दा हवा प्रदूषणात भर पडते. त्यामुळे कोळशाचा इंधन म्हणून घरगुती वापर टाळणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी जनजागृती करावी, असे ठरले.

७. **वेकोलीच्या कोळसा खाणीमुळे निर्माण झालेल्या पर्यावरणाच्या समस्या.**

चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणीमुळे निर्माण झालेल्या प्रदूषणाच्या व पर्यावरणाच्या समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. याबाबत उपस्थित असलेले भारतीय खान ब्युरोचे प्रतिनिधींनी सांगितले की, भारतीय खान ब्युरो कोळसा खाणी व्यतिरीक्त इतर खनिज खाणींचे संनियंत्रण करत असते. या अंतर्गत खनिज खाणींचा पर्यावरण संरक्षणाची बाब खाणीच्या योजनमध्येच अंतर्भुत केलेली असते

व त्याची वेळोवेळी संनियंत्रण करण्यात येते. याच धरतीवर कोळसा खाणीमधील सुध्दा प्रदुषण व पर्यावरणाच्या समस्यां जसे हवा व जल प्रदुषण, घनकचरा व्यवस्थापन व त्यामुळे पावसाळ्यामध्ये पुराची निर्माण होणारी शक्यता बंद झालेल्या कोळसा खाणीमध्ये भराव करणे, इ. बाबींचे संनियंत्रण करणेसाठी वेकोलीची एक संस्था असावी, असे ठरविण्यात आले.

८. **तडाली औद्योगिक क्षेत्रामध्ये पर्यावरण संरक्षणासाठी करावयाची कार्य.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक क्षेत्रामध्ये पर्यावरण संरक्षणासाठी खालीलप्रमाणे कार्य करण्याचे ठरले.

अ. औद्योगिक क्षेत्रामध्ये दुसऱ्या टप्प्यातील रस्ता बांधणीचे कार्य पुर्ण करावे.

ब. औद्योगिक क्षेत्रामध्ये रस्त्यांच्या दुतर्फा व ग्रीन झोनमध्ये वृक्ष लागवड करावी.

क. औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना उन्हाळ्यामध्ये मुबलक पाणी पुरवठा होईल यासाठी आवश्यक उपाययोजना करावी.

ड. औद्योगिक क्षेत्रातील धोकादायक नसलेल्या धनकचरा व्यवस्थापनासाठी शास्त्रोक्त पध्दतीचे व आवश्यक क्षमतेचे सामायीक भुभराव व्यवस्थापन केंद्र उभारावे.

९. **तडाली औद्योगिक क्षेत्र येथे रेल्वे सायडींग उभारणे.**

चंद्रपूर शहरामध्ये असलेल्या रेल्वे सायडींगमध्ये खनिज व इतर उत्पादकाची ने-आण करण्यात येते होती. खनिज व इतर उत्पादके जसे, सिमेंट इ. ची रेल्वेसायडींगमध्ये हाताळणी करत असल्यामुळे शहरातील हवा प्रदुषणास ही बाब करणीभुत ठरलेली होती. सद्यस्थितीमध्ये चंद्रपूर शहरातील या रेल्वे सायडींगद्वारे फक्त अन्न धान्यांची ने-आण वा हाताळणी करण्यात येते. त्यामुळे उद्योगांना खनिज व इतर कच्च्या मालाचा पुरवठा करणेसाठी रेल्वे सायडींग उभारणे आवश्यक आहे. असे झाल्यास चंद्रपूर शहरातील होणारी वाहनांची रहदारी सुध्दा कमी होईल व कच्च्या मालाची हाताळणीवर आळा बसेल, ज्यामुळे हवा प्रदूषण नियंत्रणास मदत होईल. त्याचप्रमाणे महामार्गावर होणाऱ्या अपघातावर सुध्दा आळा बसेल. तडाली औद्योगिक क्षेत्रामध्ये रेल्वे सायडींग उभारणी वर्धनक्षम (Viable) होणार नाही, असा मतप्रवाह असल्यामुळे याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अभ्यास करून सुसाध्यता पडताळून पहावी असे ठरले.

१०. **औष्णिक विद्युत केंद्रातील राखेचा वापर.**

सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ते बांधणीचे प्रकल्प राबविते. या प्रकल्पांमध्ये चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रातील निर्माण झालेली राखेचा वापर आवश्यक मर्यादेपर्यंत करण्याचे ठरले. त्याचप्रमाणे या राखेचा वापर कोळसा खाणींनेसुध्दा बंद झालेल्या कोळसा खाणींमध्ये करावा, अशा सुचना वेकोलीला देण्याचे ठरले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे औद्योगिक घटकांना दिलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तींचे तसेच विविध निर्देशांचे तंतोतंत पालन करून कालबध्द कृती आराखडयाची अंमलबजावणी करण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी आदेश दिले.